REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# चरित्र : एक वाङमयप्रकार

प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र.

**प्रत्येक भाषेत असणारे चरित्र-वाङमय हे ती भाषा बोलणा-यांच्या संस्कृतीची प्रगल्भता दाखविते. चरित्र हा लेखनप्रकारच आत्मप्रचितीशी बांधलेला असतो. या सहित्यप्रकाराची प्रेरणा आदरणीय व्यक्तीची स्मृती जागविणे त्याचप्रमाणे स्वतःच्या आदर्शाचे सातत्य टिकवणे अशा स्वरूपाची असते. अर्थात आजवर लिहिल्या गेलेल्या चरित्रे लेखनामागे हीच एकमेव प्रेरणा नसून कुतूहल, कृतज्ञता, भक्ती, आत्मीयता, अध्ययन, कालखुणांची नोंद, इतिहासप्रेम, अर्थाजन, व्यवसाय, मर्जी संपादन अश विविधरंगी प्रेरणा असू शकतात. असे म्हटले जाते की, प्रत्येक जीवन हा स्वतंत्र ग्रंथच असतो. धर्म, राजकारण, समाजकारण, साहित्य कला संशोधन इ. क्षेत्रातील अलौकिक व्यक्तीच बहुधा चरित्रविषय बनतात. सत्य जाणून घेण्याचे कुतूहल हे चरित्रात मुलभूतच असते. चरित्र म्हणजे चरित्रनायकाचे व्यक्तितत्व, जीवनक्रम आणि परिस्थिती या तिन्ही अंगांचा उत्तम समन्वय असतो.**

## चरित्र लेखन संकल्पनाः

**चरित्रात्मक म्हणता येईल असे ललित साहित्य गेल्या पस्तीस चाळीस वर्षातच निर्माण झाले आहे. त्यामुळे त्यासंबंधी फारसे संशोधन झालेले नाही. मराठीत चरित्रलेखनाला सातशेहून अधिक वर्षापूर्वी प्रारंभ झाला. म्हाईंभटकृत 'लिळाचरित्र' हा मराठीतील आद्य चरित्रग्रंथ आजही आपल्या वैशिष्ट्यपूर्ण स्वभावामुळे तो लक्षणीय मानला जातो. तेव्हापासून चरित्रलेखनाला आरंभ झाला तरी गेल्या दोनकशे वर्षात हा वाङमयप्रकार अधिक जोमाने वाढू लागला आहे. ख-या अर्थाने ज्याला चरित्र म्हणावे अशा ग्रंथांची निर्मिती इंग्रजी वाङमयातून प्रेरणा घेऊनच होऊ लागली. त्यामुळे चरीत्र या वाङमयप्रकाराची ओळख करून घेण्यासाठी समीक्षकांची मतेच उपयुक्त ठरणार आहेत.**

**चरित्र या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना महाराष्ट्र शव्दकोशकार य.रा.दाते म्हणतात,"आचरण, कृत्ये, क्रिया, वर्तन, अवस्था, स्थिती, देवांचे विरांचे पराक्रम, महाकृत्ये, मर्दुमकीची कामे, इतिहास, गोष्ट, कथा, विशिष्ट व्यक्तींचा आयुष्यक्रम, ती वर्णन करणारा ग्रंथ."[१] परंतु या वर्णनावरून चरित्र म्हणजे नेमके काय हे स्पष्ट होऊ शकत नाही. जॉन गॅरेटी यांनी ' मानवी गीवनाचा इतिहास असे म्हटले आहे. तर जॉन ड्रायडन यांनी चरित्र लेखन हा विशिष्ट व्यक्तिजीवनाचा इतिहास असे म्हटले आहे, य विचारात चरित्राचे इतिहासाशी साम्य असल्याचे सूचित होते. चरित्रात चटना येताना त्या व्यक्तींच्या अनुषंगाने, म्हणूनच ऑस्कफर्ड शब्दकोशात-"कलेच्या दृष्टीने लिहिलेला विशिष्ट व्यक्तिजीवनाचा इतिहास म्हणजे चरित्र होय."[२]**

(The History of the life of an individual as a form of literature) **ही व्याख्या संयुक्तिक वाटते. या व्याख्येत कलेच्या दृष्टीने हा शब्दप्रयोग महत्त्वाचा आहे. चरित्र हा केवळ इतिहासातील एक घटक बसून त्यात कलात्मकता असते व तो एक वाङमय प्रकार आहे हे या व्याख्येवरून सूचित होते. चरित्र म्हणजे व्यक्तीने जे जे केले त्या त्या सर्वांची जंत्री असे मानल्यामुळे चरित्रे इतिहासाकडे झुकली असे म्हणता येते. इतिहास व चरित्र या दोन गोष्टी जशा परस्परांशी संबंधीत, पण तरीही स्वतंत्र आहे.**

मराठी विश्वकोशात स. गं. मालशे म्हणतात, "चरित्र म्हणजे केवळ कालानुक्रमे दिलेली घटनांची जंत्री नव्हे; तर निश्चित उद्दिष्ट, निखळ संशोधन, निवडीचे तारतम्य, कल्पक संरचना, जिवंत व्यक्तिदर्शन, आकर्षक शेती यांनी मंडीत अशी ती एक एकसंघ कलाकृती असते."[३]

प्रख्यात चरित्रकार धनंजय कीर यांनी चांगले चरित्र कसे असावे यासंबंधी विवेचन केले आहे. त्यातही चरित्रनायक एक माणूस म्हणून उलगडणे महत्त्वाचे आहे असे त्यांनी म्हटले आहे. ते लिहितात,"चरित्रनायकाचे दैवतीकरण करू नये, दानवीकरणही करू नये. त्याचे करावे मानवीकरण. कारण महापुरूष झाला तरी ती ज्या गुणांमुळे महापुरूष ठरतो ते सद्गुण वगळले तर इतर गोष्टीत तो काहीसा सर्वसाधारण मनुष्यासारखाच वागतो."[४] ललितलेखनाचा आत्माच मुळी माणुसकीच्या विविधरंगी दर्शनात असतो. थोर पुरूषश्रेष्ठांच्या पुढे सामान्य माणसाम्नी नतमस्तक व्हावे यात काहीच गैर नाही. एकंदर, चांगले चरित्र लिहिताना चरित्र लिहिताना इतिहासाला असते तेच सत्याचे बंधन तर पाळलेच पाहिजे. परंतु, चरित्र विषयक व्यक्तीचे जीवन, तिचे माणुसपण उलगडीत असताना तिच्या आयुष्यातील घटनांची निवड करून त्याची कलात्मक मांडणी करून चरित्राला एक घाटही दिला पाहिजे. चरित्रात्मक साहित्यकृती ही गोष्ट कोणत्याही साहित्यप्रकाराला आव्हान देणारी असते. ज्याला उपजत देणगी आहे तोच चरित्रात्मक सहित्यकृती निर्माण करू शकतो.

चरित्रात्मक साहित्यकृती हा शुध्द सहित्यप्रकार नव्हे असे काही समीक्षकांचे मत आहे. डॉ.सदा क-हाडे त्या संदर्भात लिहितात, " कादंबरीकाराला असलेले स्वातंत्र्य चरित्रकाराला नसूनही 'चरित्र हे वाचनीय व्हावे, परिणमकारक व्हावे यासाठी चरित्रकार कादंबरीतील लेखनप्रवृत्तींचे अवलंबन करतो. पण त्यात समतोल जर राखला गेला नाही तर चरित्र कादंबरी होण्याचा धोका संभवतो. अशा प्रकारचा धोका असतो ही जाणीव चरित्रकाराला असते आणि त्यातुनच एक संकरित वाङमयप्रकार जन्माला येतो. ज्याला आपण सामान्यतः 'चरित्रात्मक कादंबरी म्हणतो. चरित्र आणि कादंबरी या दोन्ही वाङमयप्रकाराचा समन्वय त्यात साधलेला असतो. या संकरीत वाङमयप्रकारात कादंबरीकार व चरीत्रकार या दोहोंचीही सोय आहे. चरित्राला कादंबरीचे रुप देता येते आणि कादंबरीला चरित्राचे रूप देता येते."[५]

चरित्रात्मक कलाकृती पौराणिक व ऐतिहासिक कलाकृतीपेक्षा वेगळी असते असे म्हणताना डॉ.गीता साने लिहितात."एकंदर एखाद्या चरित्राप्रमाणे सत्यपूर्ण दर्शनाचे बंधन स्विकारून आणि तरिही चरित्रनायकाच्या मनोव्यापाराचे दर्शन घडविताना कल्पनेचा आधार घेण्याचे स्वातंत्र्य घेऊन चरित्रात्मक साहित्यकृती निर्माण होत असतात. या साहित्यक्रृती चरित्राचा आधार घेतात पण तरीही स्वतंत्र असतात. असामान्याचा माणूस म्हणून शोध घेण्याच्या अभिनव प्रवृत्तीमुळे सा-याच चरित्रात्मक कलाकृती पूर्वीच्या पौराणिक व ऐतिहासिक साहित्यकृतीपेक्षा वेगळ्या ठरतात. म्हणूनच चरित्रात्मक साहित्य हा एक स्वतंत्र साहित्यप्रकार मानावा लागेल."[६] चरित्रात्मक या शब्दातून चरित्राचा आधार घेणारी ती कलाकृती आहे हे स्पष्ट होते. आज या कथा, कादंब-या, नाटके यांचा आपण चरित्रात्मक म्हणून उल्लेख करतो तेव्हा या सर्व कलाकृती चरित्राचा आधार घेऊन रंजक व प्रभावी बनतात.

चरित्रलेखनाच्या वाचनाबाबत अरूण टिकेकर म्हणतात, "एखाद्या सामान्य किंवा असामान्य व्यक्तीने तिच्या जीवनातील कटू, दारूण अनुभव खचून न जाता कसे पचवले, त्या अनुभवाला धैर्याने तोंड कसे दिले, प्रतिकुल परिस्थितीवर मात कशी केली, हे जाणून घेण्यानेही जीवनाचे धडे शिकता येत असतील अशा अनुभवांभोवती गुंफलेल्या ग्रंथांच्या वाचनाने आनंद वा समाधान मिळणार असेल आणि भावनिकदृष्ट्या आपले जीवन समृध्द होणार असेल तर अशी चरित्रे वाचणे हितकारक ठरू शकते असा वाचकांचा विचार असतो."[७] संपन्न व्यक्तीमत्त्वाच्या, कर्तृत्ववान व्यक्तीची आयुष्ये प्रेरणादायी असतात. तशीच ती उद्बोधकही असतात. कोणत्याही चरित्रपर लेखनातून व्यक्तींबरोबरच त्याच्या कतृत्वाचे क्षेत्र, त्यांतील विशेषतः, परंपरा नवोन्मेष, आव्हाने यांचाही परिचय होत असतो. त्यातुन त्या-त्या कलावंताच्या जीवनसंघर्षांच्या चित्रणासह कार्यक्षेत्र विषयक जाणीवा समृद्ध करणारे लेखन समोर येते. चरित्रनायकाची प्रतिमा आपल्या मनातील प्रतिमेशी जुळते किंवा नाही एवढेच वाचकांना अपेक्षित असते. व्यक्तीजीवनाच्या इतिहासाला मिळणारे

साहित्यरूप हे मूलभूत स्वरूपाचे असल्याने ललित-ललिततेतर यांच्या सीमारेषेवरील प्रकार हे चरित्रे वाङमयाचे स्वाभाविक वैशिष्ट्ये ठरते.

जगातील बहुतेक संस्कृतीमध्ये नैतिक दृष्टीकोनातून वा आदर्शीकरणाच्या प्रेरणेतून लिहिल्या गेलेल्या आठवणी, ऐतिहासिक बखरी आणि व्यक्तिचित्रात्मक छोटेखानी चरित्रे यांच्यापासून चरित्रलेखनाला प्रारंभ झालेला आढळतो. भारतीय जीवनदृष्टी याला अपवाद नाही. मराठीत चरित्र वाङमयाचे धागेदोरे बाराव्या-तेराव्या शतकातील महानुभाव साहित्यात पहावयास मिळतात. महानुभावीय आद्य चरित्रकार महिंद्रभट्ट याने चक्रधर व गोविंदप्रभु या पंथसंस्थापकांच्या लिला किंवा आठवणी अनुक्रमे लीळाचरित्र (१२७६) आणि गोविंद प्रभु चरित्र (१२८८) या ग्रंथात संग्रहीत केल्या आहेत. 'स्मृतिस्थळ हा नरेंद्र व परशुराम यांचा ग्रंथही याच धर्तीचा आहे. या ग्रंथांमधुन पंथाचार्यांच्या लौकिक व अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ दर्शन घडते व त्याचबरोबर यादवकालीन गद्याचा स्वाभाविकपणा याचा प्रत्यय येतो.

प्राचीन मराठी संतांपैकी ज्ञानदेव व रामदास यांच्यासंबंधी चरित्रपर लेखन मोठ्या प्रमाणात झालेले दिसून येते. संतकालीन मराठी कवींपैकी अनेकांनी पद्यात निरनिराळ्या संतांची लहानमोठी चरित्रे लिहिली आहेत. यात महिपतीबोवा ताहराबादकर यांचे 'भक्तलिलामृत व संतलीलामृत हे ग्रंथ प्रसिध्द आहेत. रामदासांच्या चरित्रात गिरिधरकृत समर्थप्रताप, उध्दवसुतकृत, रामदासचरित्र असे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. हा काळ ईश्वरविषयक श्रध्देचा व साधुसंतांबद्दलच्या आदरभावनेचा असल्याने यातील दृष्टी भाविकाची आहे. जुन्या काळच्या बखरीतही एका अर्थाने चरित्रगुण अधिक आढळतात. यात शिवाजी, संभाजी व राजाराम यांच्या बखरी खास उल्लेखनीय आहेत.

आधुनिक मराठीत बरेच गद्य प्रकार इंग्रजी वाङमयाशी परिचय झाल्यानंतर सुरू झाले असले तरी चरित्राविषयक लेखन मात्र संतसाहित्य आणि बखरींमध्ये दिसून येते मात्र हे लेखन काहिसे अलौकिक स्वरूपाचे दिसून येते. अव्वल इंग्रजी कालखंडात चरित्र वाङमय अनुवादित स्वरूपाचे व दक्षिणा प्राईज कमिटीने दिलेल्या प्रोत्साहनामुळे निर्माण झाले यात परकिय थोर व्यक्तीही चरित्रविषय झालेले दिसतात. जनार्दन रामचंद्रकृत कवीचरित्र (१८६०) व आजरेकरकृत श्री विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८७२) हे चरित्रलेखनाचे महत्त्वाचे प्रयत्न आहेत. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी जॉनसन (१८७६) हे प्रदिर्घ निबंधवजा चरित्र लिहून चरित्रलेखनाची प्रेरणा दिली व मराठी चरित्रास विशिष्ठ दिशा प्राप्त करून दिली.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी पाश्चत्य साहित्याशी सुशिक्षितांचा विशेष परिचय झाला. परिणामी चरित्रवाङमयाची वाढ विशेषत्वाने झाली. ऐतिहासिक थोर व्यक्ती, राजकीय नेते, समाजसुधारक, ग्रंथकार, कलावंत यांची चरित्रे साधार रीतीने लिहिली जाऊ लागली. चरित्रलेखन ज्यांच्या आयुष्यभर चिंतनाचा विषय रहिला त्या द. न. गोखलेंच्या चरित्रलेखनात नवाच व्यक्तिविमर्श जाणवतो. सावरकर-एक रहस्य यातून डॉ. गोखले नेहमीपेक्षा व्यक्तीविमर्शाचा वेगळा प्रयोग करताना दिसतात. यात सावरकरांच्या व्यक्तितत्वातील एकेका अंशाचा स्वतंत्र वेध लेखरूपात घेत त्याला सलगपणे एकत्र गुंफले. महात्मा गांधी - मानव की महामानव या चरित्रात त्यांनी व्यक्तिविमर्श कळण्यासाठी आत्मनिवेदन पध्दत वापरली आहे. गांधीजींच्या व्यक्तितत्वाचे विश्लेषण करून विशिष्ट घटकांना प्राधान्य देत व्यक्तिविमर्शाचे शब्दांकन केले त्यांच्या तिस-या डॉ. आंबेडकरांचे अंतरंग यात निवेदनपध्दती चरित्राचीच म्हणजे कालानुसारी स्वीकारली. कालानुसारी निवेदनातून व्यक्तित्व लेखनाच्या प्रयोगात व्यक्तितत्वावर लक्ष केंद्रित करत ते लिहिले गेले आहे.

आधुनिक मराठीत चरित्रांचा स्वतंत्रपणे विचार करण्याइतकी संख्या लक्षणीय आहे. विविध क्षेत्रातील नामवंत चरित्र नायकांचा विचार या काळात चरित्रकारांनी केलेला आहे. ज्या कार्यक्षेत्रात चरित्रनायकाचा अधिकाधिक वावर त्या क्षेत्रानुसार राजकारण, समाजकारण, धर्मकारण, साहित्य, खेळ, संशोधन, चित्रशिल्पकला, संगीत, नाट्य, चित्रपट, अभिनय असे वर्गीकरण करता येते. यात चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे त्या क्षेत्रातील वेगळेपण महत्त्वाचे आहे. चरित्र वाङमयात कालिक विचार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्या त्या चरित्रनायकांवर व चरित्रकारांवर पडणारा प्रभावही महत्त्वाचा ठरतो.

अलिकडच्या काळात मराठी चरित्रात्मक लेखन मोठ्याप्रमाणात आले आहे. या काळात चरित्रलेखनाचा आकृतीबंध बदललेला आहे. चरित्र म्हणजे एखाद्या व्यक्तिच्या संपुर्ण आयुष्याचा वृत्तांत अशी कल्पना पूर्वीपासून होती. पण आता एखाद्याचे पूर्ण जीवन न रेखाटता त्याच्या कामगिरीबद्दल, कतृत्व विषयाबद्दल, त्यावरच भर देऊन लिहिले जाते. चरित्रांचा विशिष्ठ वाचकवर्ग हा चरित्रापासून उपदेश मिळतो, माहिती मिळते अशी अपेक्षा बाळगतो. केवळ तपशिलावर भर देण्यापेक्षा चरित्रांची जागा आज ललित चरित्रे घेऊ लागलेली आहेत. कोणते चरित्रनायक लोकप्रिय आहेत. याचा विचार करता भारतीय पातळीवरचे नेते, कलावंत यांची नावे पुढे येतात. आज समाजाचे नेतृत्व कुणा एका व दोन-चार नेत्यांकडे नाही, तर ते अशा कर्तबगार माणसांकडे गेले आहे. विविध कार्यक्षेत्रातील यशस्वी माणसांच्या संघर्षाच्या, यशप्राप्तीच्या कहाण्या आजच्या वाचकाला आकर्षून घेतात. सामान्य माणसांनी स्वकर्तृत्वावर मिळवलेले यश पाहून, वाचकांना ते नायक वाटतात. त्यांच्याशी आपण स्वतःला जोडून घेऊ शकतो असे सर्वसामान्यांना वाटते. त्यामुळे एक होता कार्व्हर सारखा कृष्णवर्णीय कृषीतज्ज्ञ त्यांच्या नायकाच्या प्रतिमेत बसतो किंवा अब्दुल कलामांसारखा शास्त्रज्ञ त्यांना प्रेरक वाटतो. नवी वाट तयार करण्याचे काम त्यांनी केले आहे, याच भावनेतून महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचा अनमोल सहभाग आहे अशा ६५ व्यक्तितत्वांचा पुर्नबंध घेणारा चरित्र-ग्रंथसंच पुण्याच्या श्री गंधर्ववेद प्रकाशनने केला आहे. यातील काही चरित्रनायकांचे कर्तृत्व प्रथमच वाचकांपुढे आले आहेत आणि त्या चरित्रनायकांचा वर्तमानाशी सांधा जोडणारी आहेत. आज अशा चरित्रांची उपयुक्तता अधिक जाणवते, हे सांगावेसे वाटते.

१) दाते य. रा. महाराष्ट्र शब्दकोश, महाराष्ट्र कोशमंडळ लिमि. पुणे. पृ.१९५०
२) जे बी. सायकेस. (संपा.) दी कन्साईस ऑक्सफर्ड डिक्शनरीम पृ. ९७
३) मराठी विश्वकोष खंड ५, पृ. ६७६
४) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नववी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ.१०
५) कहाडे सदा, (डॉ.), चरित्र आणि आत्मचरित्र, प्र. आ. लोकवाङमय प्रकाशन, मुंबई १९७६
६) मांजरेकर गीता (डॉ.), चरित्रात्मक नाटक संकल्पना आणि समस्या, डिंपल प्रकाशन २००१,पृ. १२
७) टिकेकर अरूण, ललित जून-जुलै २०१३, पृ. ११